# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

**एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली - ४४२६०५**

**दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४, email:- gondwanaesst@gmail.com**

जा.क्र. गों.वि/आस्था/2775/२०१७ दिनांक : २९.०९.२०१७ 09.10.2017

## परिपत्रक

विद्यापीठातील पदव्यूत्तर शैक्षणिक विभाग व संलग्नीत सर्व महाविद्यालये यांना कळविण्यात येते की, या परिपत्रकासोबत संलग्नीत समाज कल्याण कार्यालय, चंद्रपूर पत्र क्र. सआसकचं/आस्था/२८७५ दि. ११/०९/२०१७ च्या पत्रानुसार मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी बोगस जात प्रमाणपत्रावर पदवी घेणाऱ्या पदवी धारकांवर फौजदारी कार्यवाही करणेबाबत जिल्हयातील सर्व उच्च शैक्षणिक संस्था/महाविद्यालये यांच्याकडून सविस्तर अहवाल मागविण्यास सुचित केलेले आहे.

करिता आपल्या संस्थेत/महाविद्यालयात बोगस जात प्रमाणपत्रावर पदवी/पदविका मिळविणाऱ्या अथवा मिळविलेल्या पदवी/पदवीकाधारकांवर केलेल्या कार्यवाहीबाबतचा सविस्तर अहवाल सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, चंद्रपूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, शासकीय दुध डेअरी रोड, जलनगर वार्ड, चंद्रपूर या कार्यालयाकडे तातडीने उपलब्ध करून देण्यात यावे, ही विनंती.

कुलसचिव (प्र)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतीलिपी:—

१. मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर जिल्हा, चंद्रपूर.
२. सहा. आयूक्त, समाज कल्याण विभाग, चंद्रपूर

अत्यंत महत्त्वाचे /
मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाची अंमलबजावणी

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 3034 22/9/17
जावक क्र. 5015 25.9.17

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
कार्यालय :- सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, चंद्रपूर

Email :- chasdswo@gmail.com
Phone No.:- 07172-253198

---

जा.क्र.सआसकचं/आस्था/बोगस जातप्रमाणपत्रे/फौजदारी कार्यवाही/२०१७-१८/ 2875 दि. :- 11/०९/२०१७

प्रति,

१) मा. निबंधक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२) मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व दवाखाना, चंद्रपूर.
३) प्राचार्य, सर्व महाविद्यालये, (वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवसाय प्रशिक्षण संस्था इ.)

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आवक क्र. 2671 दि. 25.9.1
जावक क्र. ............ दि. ............

**विषय :- बोगस जात प्रमाणपत्रावर पदवी घेणाऱ्या पदवी धारकांवर फौजदारी कार्यवाही करणेबाबत... सविस्तर अहवाल सादर करणेबाबत.**

संदर्भ :- १) मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी CIVIL APPEAL NO 8928 OF 2015 Etc. Etc या प्रकरणी CJI [JAGDISH SINGH KHEHAR], J [N V RAMANA], J [Dr DY CHANDRACHUD], New Delhi दिनांक July 06, 2017 रोजी दिलेला निर्णय.
२) श्री. केशव तिराणिक (पत्रकार) विदर्भ सचिव, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, भद्रावती, जि. चंद्रपूर व इतर यांचे निवेदन दिनांक ३१.०७.२०१७
३) मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे पत्र क्र. एमएजी/कार्या-८/टे-१/सांले/२०१७/३२४, दिनांक १४.०८.२०१७.
४) मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे टिपणीवरील निर्देश दिनांक ०६.०९.२०१७.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयी सर्व शासकीय तसेच खाजगी शैक्षणिक संस्थांचे प्रमुखांना सविनय सादर करण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी उपरोक्त संदर्भिय १ अन्वये दिलेल्या आदेशानुसार ज्या विद्यार्थ्यांनी बोगस जात प्रमाणपत्रावर पदवी धारण केली असेल त्यांचेवर फौजदारी कार्यवाही करण्याबाबत किंवा जे पदवी / पदव्युत्तर शिक्षण घेत असतील त्यांचे प्रवेश रद्द करून फौजदारी कार्यवाही करण्याबाबत श्री. केशव तिराणिक (पत्रकार) विदर्भ सचिव, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, भद्रावती, जि. चंद्रपूर व इतर यांनी संदर्भिय ३ चे निवेदनाद्वारे मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडे विनंती दिनांक ३१.०७.२०१७ रोजीच्या अर्जान्वये केलेली आहे.

प्राप्त निवेदनाचे अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी याबाबत जिल्हयातील सर्व उच्च शैक्षणिक संस्था-महाविद्यालये यांच्या प्रमुखांकडून सविस्तर अहवाल मागविण्यास सूचित केलेले आहे.

तरी कृपया मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचे संदर्भ क्रमांक १ च्या प्रकरणी दिनांक ६ जुलै, २०१७ रोजीच्या आदेशाचे अवलोकन करून आपल्या शैक्षणिक संस्थेत पदवी/ पदविका मिळविणाऱ्या अथवा मिळविलेल्या पदवी/ पदवीकाधारकांवर केलेल्या कार्यवाहीबाबतचा सविस्तर अहवाल सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, चंद्रपूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, शासकीय दुध डेअरी रोड, जलनगर वार्ड, चंद्रपूर या कार्यालयाकडे उपलब्ध करून दयावा. ही विनंती.

**सहपत्र :- वरील प्रमाणे.**

आपला विश्वासु,
(प्रसाद कुळकर्णी)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, चंद्रपूर

**प्रतलिपी :- माहितीस्तव सविनय सादर.**
१) मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर.
२) मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, नागपूर.
३) श्री. केशव तिराणिक (पत्रकार) विदर्भ सचिव, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, भद्रावती, जि. चंद्रपूर.

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, चंद्रपूर